# National Sports Day

National Sports Day is celebrated on 29th August 2017 in the memory of Major Dhyanchand, the magician of hockey. Hon'ble President Vitthal Patil Saheb paid homage to the image of Major Dhyanchand and guided all the players. The principal of the college Dr. Balasaheb Ladgaonkar guided the players. Director of Physical Education Prof. Vikram Yamagekar explained the biography of Major Dhyanchand. All the professors and players were present at this occasion. Prof. Rakshase thanked everyone



.




पुढारी

# कळेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**कळे : वार्ताहर**

कळे (ता. पन्हाळा) परिसरात भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद सिंग यांची जयंती 'राष्ट्रीय क्रीडा दिन'म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

**विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे**

कळे येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक विठ्ठलराव पाटील व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगावकर उपस्थित होते.

प्रतिमापूजन विठ्ठलराव पाटील यांच्या हस्ते व क्रीडा साहित्याचे पूजन प्राचार्य डॉ. लाडगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. लाडगावकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑलिम्पिकमध्ये यश मिळवतील, असा विश्वास व्यक्त केला. यानंतर प्रावीण्यप्राप्त खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात शा. शि. संचालक प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी मेजर ध्यानचंद यांचा जीवनपट उलगडून सांगितला. याप्रसंगी संस्था संचालक राहुल पाटील, प्रा. के. बी. पात्रे, प्रा. नितीन पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व खेळाडू उपस्थित होते.

**विठ्ठल पाटील माध्यमिक विद्यालय कळे**

कळे येथील विठ्ठल पाटील माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंदसिंग यांची जयंती 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका डॉ. पी. एस. भोसले होत्या.

क्रीडा शिक्षिका ए. ए. पवार यांनी 'हॉकी खेळ' व मेजर ध्यानचंद यांच्याविषयी माहिती सांगितली. याप्रसंगी एस. डी. भांदिगरे, एस. यू. माळी, ए. एस. भोसले, के. बी. पाटील, ए. आर. कुंभार, प्रा. आर. एस. मुल्ला, प्रा. डी. आर. उत्तुरकर, प्रा. डी. व्ही. पाटील, प्रा. चव्हाण, प्रा. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन एम. एस. पाटील यांनी केले. एस. एन. नांदवडेकर यांनी आभार मानले.

## मलकापूर युवासेना अध्यक्षपदी पाटील

**मलकापूर :** मलकापूर शहर युवासेनेच्या अध्यक्षपदी तुषार तानाजी पाटील यांची तर उपशहर प्रमुखपदी दिगंबर कुंभार यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याचे पत्र शिवसेना जिल्हाप्रमुख मुरलीधर जाधव यांनी दिले. यावेळी उपजिल्हाप्रमुख नामदेव गिरी, तालुकाप्रमुख दत्तात्रय पोवार, आघाडीप्रमुख प्रकाश पाटील, दिनेश पडवळ, उपशहरप्रमुख राहुल पोवार, सुरेश चांदणे, अनिकेत हिरवे, तेजस बेंडके, शौकत कळेकर आदी शिवसैनिक व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.